महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्र. १४४७(२)/मुला.का/२०२३/वीस दिनांक:- २६ ऑगस्ट, २०२४

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२३- मुलाखत कार्यक्रमाबाबत. (तिसरा टप्पा)**

संदर्भ :- १) आयोगाचे क्र. १४७७(२)/२०२३/वीस, दिनांक १६ जुलै, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २ ऑगस्ट, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
३) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा, २०२३च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १६ जुलै, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या तिसऱ्या टप्प्यातील मुलाखतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेला आहे.

| परीक्षेचे नाव | मुलाखत दिनांक | मुलाखतीचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२३ | दि. ३ ते ६ सप्टेंबर, २०२४ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग ११ वा मजला, त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट क्रं. ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४. | सकाळी ८.३० वा. |

३. मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांनी मुलाखतीकरीता कोणत्याही परिस्थितीत विहित दिनांकास व विहित वेळेवर उपस्थित रहावे.

४. मुलाखतीकरीता उपस्थित राहताना रुग्णालयाकडून वैद्यकीय तपासणी पूर्ण झाली असल्याचे जबाबदार अधिकाऱ्याची सही व शिक्क्यासह प्रमाणित केलेले वैद्यकीय तपासणी पत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे अनिवार्य आहे.

५. अर्जात केलेल्या दाव्यापृष्ठर्थ आवश्यक ती विहित नमुन्यातील सर्व मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे मुलाखतीच्या दिवशी सादर करणे आवश्यक असून सदर विहित नमुन्यातील वैद्यकीय तपासणी पत्र, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही व ती सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

६. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतपत्र त्यांच्या प्रोफाईलवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव(परीक्षोत्तर)(राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.